ISSN No. 2455-4928
मूल्य ₹४०/-

मासिक साहित्य

# चपराक

www.chaprak.com
एप्रिल २०१८

संपादक : घनश्याम पाटील

▪ वर्ष : दहावे ▪ अंक : चौथा ▪ पृष्ठे : ५२



एक परिपूर्ण मासिक

सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

Website :www.chaprak.com

चतुरस्त्र परखड रास्त कर्तव्यदक्ष

**ISSN. No.** 2455-4928

**संस्थापक, संपादक :** घनश्याम पाटील

**सहसंपादक** : माधव गिर

**उपसंपादक** : सौ. चंद्रलेखा बेलसरे

**व्यवस्थापक** : वसंतराव पाटील

**सल्लागार** : सुधीर गाडगीळ, ज्ञानेश्वर तापकीर, वैभव जोशी, विकास मुंदडा,

**मुखपृष्ठ** : संतोष घोंगडे

**कार्यालयीन व्यवस्थापक** : प्रमोद येवले

**ऑनलाईन व्यवस्थापक** : वैभव कुलकर्णी

**अंतर्गत सजावट** : निखील भोसले

**अन्य सहकारी** : मोरेश्वर ब्रह्मे, अरुण कमळापूरकर, अर्चना डावरे, विनोद श्रा. पंचभाई, सागर सुरवसे, सागर कळसाईत, सचिन सुंबे.

संपादकीय कार्यालय

**'चपराक प्रकाशन'**

फ्लॅट क्र. २, सुवर्णमयी सह. गृहरचना संस्था, १४ वी गल्ली, परमहंसनगर, वनाज कंपनी समोर, पौड रस्ता, कोथरूड, पुणे ४११ ०३८ **दूरध्वनी - ०२० - २५३८४९०९**

**भ्रमणध्वनी** ७०५७२ ९२०९२, ७७२००१०३५४

वेबसाईट: www.chaprak.com इ-मेल: info@chaprak.com

## अंतरंग


- जोशींचा श्री-पाद!/**घनश्याम पाटील**/६
- अ‍ॅट्रोसिटी आणि अर्थकारण/**संजय सोनवणी**/९
- कस/ **प्रा. सुरेश भिलकोटकर**/१३
- कर्तृत्वगाथा-शंभरीच्या तरूणाची/**नंदकुमार सुर्वे**/ १६
- उन्हाळ्याची सुट्टी, वाटते नकोशी/ **मनिषा वाणी/१८**
- साहित्यप्रेमी, निष्ठावंत पत्रकार सुजाता देशमुख/ **शारदा शिंत्रे/२०**
- 'शिवायन'ची जन्मकळा / **प्रा. दादासाहेब मारकड** /२२
- सर्वार्थाने आनंदी, ग्रीष्माची चाहूल/ **ज्योति शिरोडकर**/२४
- किल्ले राजगड /**संदीप तापकीर** /२६
- परीक्षण - त्रिकोणातील वादळ पेलताना/ **विद्या बयास**/२८
- 'सोशल मीडियामुळे हरवलीय माणुसकी/ **अस्मिता येंडे/३२**
- बँकांचे पुनर्भांडवलीकरण/ **चन्द्रशेखर टिळक** /३४
- परीक्षण-उणे अधिक उणे/ **सुभाषचंद्र वैष्णव/३७**
- आर्थिक गैरव्यवहार थांबवणे आपल्याच हातात/ **विजय पांढरीपांडे**/३८
- कौतुकाचा बहर ओसरला... पुढे?/पराग पोतदार/**४०**
- दुरावा/**प्रकाश हाटे/४३**
- नगर आठवण साठवण/**सदानंद भणगे**/४४
- सुजाण पालकत्व.../**अ‍ॅड. शैलजा मोळक**/४८
- वाचक प्रतिसाद/**५०**


### कविता


- **अनघा तांबोळी / १९**
- **तृप्ती काळे/ २३**
- **अशोक कुळकर्णी/ २७**
- **मानसी चिटणीस/३१**
- **गणेश पोटफोडे/ ३३**
- **प्रा. सुनील तोरणे/ ३६**
- **सचिन कृष्णा तळे/ ४७**
- **सुजित कदम/ ४७**


'साहित्य चपराक' हे मासिक मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस, सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे - ४११ ०४१ येथे छापून ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ,पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : घनश्याम वसंतराव पाटील
(अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही) न्यायालयीन कारवाई पुणे न्यायालय अंतर्गत.

# कस





■ प्रा. सुरेश भिलकोटकर
नाशिक, चलभाष-९४२२२९२६७०

**माझे** डी. एड. चे दुसरे वर्ष सुरू झालेले होते. मी त्यावेळी वसतिगृहात रहात असे. दररोज संध्याकाळी जेवणानंतर मी एका शिंप्याकडे कामासाठी जायचो. रात्री अकरा-साडेअकराला परतायचो. नांदगावच्या गांधी चौकाच्या उत्तरेकडील बोळीत हे शिंप्याचे दुकान होते. गांधी चौक दिवसा गजबजलेला असला तरी रात्री दहानंतर मात्र सामसूम असे.

त्र्याऐंशी सालातील जुलै महिना चालू होता. भारताने फ्रुडेन्शीअल विश्वकप नुकताच जिंकला होता. त्याचे साद-पडसाद देशभर उमटत होते. नेहमीप्रमाणे जरा कुठे खुट्ट व्हावे आणि मालेगाव तापावे, तसे यावेळेस मालेगाव चांगलेच तापले होते. मालेगावात मोठी दंगल उसळली होती. तेथील दंगलीची झळ मनमाड-नांदगावपर्यंत पोहोचली होती.

अशाच परिस्थितीत एके दिवशी संध्याकाळी जेवण झाल्यानंतर मी रात्री शिंप्याकडे गेलो. नेहमीप्रमाणे कामाला आणि गप्पांनाही सुरूवात झाली. शिंपी धर्माने मुस्लीम होता. शिक्षण जेमतेम होते. तरीही मालेगावमध्ये होणाऱ्या धार्मिक संघर्षावर त्याची अतिशय पुरोगामी अशी मते होती. ट्रेनिंग कॉलेजातील हारूण मण्यार नावाच्या मित्राच्या ओळखीनेच मला हे काम मिळाले होते. तो अधूनमधून माझ्यासोबत येत असल्याने शिंपी आणि माझेही अनौपचारिक संबंध तयार झाले होते.

त्या दिवशी शिवणकाम आणि गप्पा जरा जास्तच झाल्या. रात्रीचे साडेबारा-पाऊण वाजले होते. घाईघाईत पायात चप्पल अडकवून मी दुकानाबाहेर पडलो. गांधी चौक ते ट्रेनिंग कॉलेजचे आमचे वसतिगृह यात साधारण एक-दीड किलोमीटर अंतर होते. दररोजच रात्री किमान अकरा साडे-अकरा वाजायचे. त्यामुळे सर्वत्र शांतता असे. मी एकटा माझ्या नादात-तालात दररोज जात असे.

आज अधिकच उशीर झाला होता. शिंप्याच्या बोळीतून बाहेर चौकात येताच रेल्वे गेटकडील रस्त्यावरून कोणीतरी जोरात खेकसल्याचे जाणवले. पाहतो तर तीन-चार पोलीस माझ्या दिशेने लाठ्यांसह धावत आणि शिव्या हासडत येताना दिसले. मी घाबरलो. काय झाले मला कळेना. तोपर्यंत त्यांच्यातील आणि माझ्यातील अंतर कमी होऊ लागले. ते माझ्याच रोखाने येत असल्याचे आता निश्चित झाले. मी गर्भगळीत झालो. माझ्या बचावासाठी हालचाली सुरू झाल्या. उगीचच काहीतरी करायचे म्हणून मी थोडा मागे सरकलो. तोच एका पोलीसाची लाठी फर्ररर्रड्ड आवाज करीत माझ्या दिशेने आली. ती मी कशीबशी हुकवली. आता चांगलाच चोप बसणार... किमान एखादा हातपाय, काहीतरी निकामी होणार याची खात्री झाली. वसतिगृहाकडे जावे की शिंप्याकडे असे व्दंद क्षणभर माझ्या मनामध्ये झाले. पण विचार करण्यास फार वेळ नव्हता. एकाची लाठी हुकली तरी दुसऱ्याची केव्हाही माझ्या दिशेने येऊ शकत होती. मी सर्व शक्ती एकवटली. वसतिगृहाकडे जाण्यासाठी धूम ठोकली. तोच दुसऱ्या पोलीसाने लाठी भिरकावली. ती माझ्या उजव्या पायाच्या टाचेला चाटून गेली. खरंतर यावेळी मी हेलपाटून पडलोच असतो. मी वेग वाढवला. गांधी चौकातून शनिमंदीर आणि ट्रेनिंग कॉलेजकडे जाणाऱ्या नांदगावच्या वाकड्या गल्ल्यांनी मला वाचवले. या गल्ल्या अतिशय छोट्या-छोट्या आणि वळणाच्या होत्या. पहिली छोटीशी गल्ली संपून दुसरीत वळल्यामुळेच मी दुसऱ्या लाठीतून वाचलो. पुढेही अशीच वेडीवाकडी वळणे असल्यामुळे मला पळणे सोपे झाले. या वळणांमुळेच पोलीस व माझ्यातील अंतरही वाढले.

शनिमंदिरापासून पुढे अंतर खूप होते. जैन धर्मशाळेपासून पुढे फारशी घरेही तेव्हा नव्हती. काही अंतरावर डाव्या बाजूला गुप्ता चाळ आणि उजवीकडे भिका पाटलांची पिठाची गिरणी होती.

रात्रीचा प्रहर असल्याने सर्वत्र शुकशुकाट होता. कुठे आसरा मिळणेही शक्य नव्हते. हा पुढचा रस्ता सरळसोट असल्याने लाठी भिरकावून कोणत्याही क्षणी मला पोलीस आडवे करतील अशी भीती वाढत होती. कुठेतरी सिनेमात चोर-पोलीसांच्या चकमकीला शोभेल असेच हे दृश्य होते. जीव घेऊन पळणारे सावज आणि शिकार टप्प्यात आल्याने ती साधण्याच्या प्रयत्नात असणारे तीन-चार शिकारी असे ते थरारनाट्य प्रत्यक्षात रंगत होते. माझे जीव मुठीत धरून धावणे चालूच होते. रात्री अकरानंतर वसतिगृहाचे मुख्य प्रवेशव्दार बंद होत असे. प्राचार्य वसतिगृहाजवळच रहात असत. रात्री अकरानंतर प्रवेशद्वार उघडे ठेवत नसत. तशी प्राचार्यांची सक्त ताकीद होती. परंतु प्रवेशद्वाराची जबाबदारी असलेल्या मित्रांना माझी अडचण माहीत होती. माझ्यासाठी ते साडे-अकरापर्यंत प्रवेशद्वार उघडे ठेवत असत किंवा अधिक उशीर झाला तर गुपचूप माझ्यासाठी उघडून देत असत; परंतु ते प्राचार्यांना न सांगता घडत असे. मी रात्री जेवणानंतर कामासाठी गावात जातो हेच मुळी प्राचार्यांना सांगितलेले नव्हते.

वसतिगृहाचा दरवाजा बंद असल्यास तो उघडण्यास काहीतरी वेळ जाणार याची मला जाणीव झाली. तोपर्यंत पोलीसांपुढे माझी खैर नाही याचीही खात्री झाली. पळून पळून थकलो होतो. पोलीसांचाही वेग कमी झाल्याचे जाणवले; परंतु पाठलाग चालूच होता. शेवटी मी सर्व शक्ती एकवटली. वेग वाढवला. सुसाट धावलो आणि प्राचार्यांचा दरवाजा गाठला. धाड ऽऽ धाड ऽऽ असा दोन्ही हातांनी वाजवला. आवाज एवढा मोठा होता की प्राचार्य क्षणार्धात उठले. ''कोण आहे? कोण आहे?'' असे म्हणत त्यांनी दरवाजा किरकिरा केला. तसा मी म्हटलो, ''सर मला प्रथम आत घ्या.'' पोलीस माझ्या मागावर आहेत!'' त्यांची झोप क्षणार्धात उडाली.

''अरे पाटील! तूं..? एवढ्या रात्री कुठे गेला होतास...? आणि पोलीस तुझ्या मागावर कसे...? काय चाललंय काय...?'' सर प्रश्नांवर प्रश्न विचारत असतानाच मी सरळ दरवाजा ढकलून घरात शिरलो. तोपर्यंत पोलीसही हजर झाले.

''काय झाल? कोण पाहिजे आपल्याला?'' प्राचार्यांनी विचारले.

तुमच्या घरात शिरलेला मुलगा आमच्या ताब्यात द्या!'' पोलीस

''का..? काय केलंय त्यानं... अहो तो आमचा विद्यार्थी आहे.''

''साहेब, रात्री दहा वाजेपासून संचारबंदी आहे आणि हा गांधी चौकात संशयास्पद रीतिने फिरताना आम्ही पाहिलाय! म्हणून तो आम्हाला हवाय!''

सरांचा राग अनावर झाला, त्यांनी चढ्या स्वरात विचारले.

''सुरेश तू काय करीत होतास एवढ्या रात्री गांधी चौकात?''

''सर मी दररोज रात्री कामासाठी गावात जातो. रात्री अकराच्या दरम्यान परतत असतो. आज मला अधिक उशीर झाला. माझे काम आटोपल्यावर बाहेर पडलो. तर बाहेर नेहमीपेक्षा वेगळी काही परिस्थिती असेल याची मला कल्पना आली नाही. पोलीस मारायला किंवा पकडायला येताहेत म्हणून जीव घेऊन धावत सुटलो एवढेच... बाकी दुसरा माझा काही गुन्हा नाही सर...!''

''मग एवढं पळायचं काय कारण? स्पष्टपणे सांगायचं नाही का त्यांना?''

''सर तेवढा वेळ नव्हता. तसा प्रयत्नही करणेही अवघड होते. काही सांगण्याआधीच दोन-चार लाठ्या माझ्या अंगा-खांद्यावर बसतील याची खात्री झाल्यानेच मी पळालो. सॉरी सर...!''

एवढ्या संभाषणात पोलीसांच्याही लक्षात सारा प्रकार आला होता. वसतिगृहातील मुलांना रात्री-बेरात्री बाहेर सोडू नका, अशी विनंतीवजा सूचना करून पोलीस निघून गेले.

''अरे पाटील? एवढ्या रात्री कुठे? ठिकंय... आता रात्र बरीच झाली... तू जा आणि झोप आता! उद्या सकाळी पाहू?'' सर वैतागाने म्हणाले.

मी वसतिगृहात माझ्या एकवीस नंबरच्या खोलीत गेलो. जमिनीवर अंग टाकले. झोप लागणे शक्यच नव्हते. पुरती दमछाक झाली होती. संकटातून सुटका झाल्याबद्दल हायसे वाटत होते. तर सरांना एवढ्या अपरात्री उगीचच त्रास दिला, याबद्दल अपराधीपणाची भावना वाढीला लागत होती. रस्त्यात कुठे सहारा मिळाला असता तर सरांना नसता दिला त्रास! पण काय करणार परिस्थितीच अशी उद्‌भवली की जीव घेऊन पळण्याशिवाय हाती काहीच राहिले नाही. खरे म्हणजे शहरात संचारबंदी लागू झाली असे अगोदर कळाले असते तर शिंप्याच्याच दुकानात रात्र काढली असती. माझा पोलीसांबद्दलचा होराही चुकला होता. गांधी चौकातून पळ काढल्यानंतर ते थेट वसतिगृहापर्यंत कशाला येतील? असे मला वाटले होते; परंतु त्यांनी माझा थेट पिच्छा पुरवला होता. त्यामुळे इच्छा नसतानाही सरांचा दरवाजा ठोठवावा लागला.

अर्थात प्राचार्य मला पूर्णतः ओळखत होते. पहिल्या वर्षभरातील माझी वागण्याची, अभ्यासाची पद्धती त्यांच्यासह सर्वच अध्यापकवृंदांना आवडलेली होती. माझी घरच्या आर्थिक परिस्थितीचीही बहुतेक शिक्षकांना कल्पना होती. ट्रेनिंग कॉलेजच्या आणि वसतीगृहातील सर्व उपक्रमात मी आघाडीवर असे. प्रथम वर्षाला सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी म्हणून मी प्राचार्यांच्या लक्षात होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात पंचवीसची घंटा झाली. प्रार्थना झाली. नेहमीप्रमाणे मी वर्गात जाऊन बसलो. प्राचार्य केव्हाही वर्गावर येऊन मला रात्रीच्या प्रकाराबद्दल विचारतील याची मला खात्री होती. सरांना नेमके काय वाटत असेल. अशा विचारात मी होतो. तितक्यात सरांनी मला बोलावल्याचे ठाकरे मामांनी सांगितले. वर्गातील मॉनिटरशीप, होस्टेलप्रमुख, कॉलेजातील अवांतर कामे यात मी नेहमीच पुढे असे. त्यासाठी सर अधूनमधून बोलावत असत. त्यामुळे या बोलावण्याचेही इतर कोणाला काही वेगळे वाटले नाही.

मी मात्र विचारात बुडालो होतो. सरांनी रात्री गावात जायला मला बंदी घातली तर पुढे काय? केवळ याच आर्थिक स्त्रोतावर माझे ट्रेनिंगचे एक वर्ष पूर्ण झाले होते. काम बंद करून शिक्षण घेणे मला शक्यच नव्हते. वसतिगृहाचे मुख्य द्वार अकरानंतर कोणत्याही परिस्थितीत उघडे ठेवायचे नाही असा सरांचा आदेश होता. मी मात्र दररोज रात्री अकरानंतर येतो हे सिद्ध झाले होते. त्यामुळे मला अकरानंतर आत घेण्यासाठी दरवाजा उघडणारी मुले आणि अधिक्षक यांचीही माझ्यामुळे कानउघडणी होणार असेही मला वाटून गेले. माझ्यात अपराधीपणाची भावना बळावत होती. प्राचार्य बी. एस. पाटलांचा स्वभाव कणखर होता. प्रशासनात ते कोणाचाही मुलाहिजा ठेवत नसत. यामुळे मला वसतिगृहात सांभाळून घेणारे मित्र आता अडचणीत आले होते. लहान भावाप्रमाणे प्रेम करणारे अधिक्षकही अडचणीत येणार होते. डोक्यात निरनिराळ्या विचारांची वलये घेऊनच मी प्राचार्यांच्या केबिनजवळ पोहचलो,

''आत येऊ सर?''

''हं, ये!''

काही क्षण शांततेत गेले.

''सर मला बोलावलंय.?'' मी नम्रपणे विचारले. लगेचच साफ माफी मागून मोकळे व्हावे, या हेतूने मी बोलणार. तोच सर म्हणाले,

''सुरेश'' गेल्या वर्षी प्रवेश घेतल्यानंतर तू एक दिवस मला भेटला होतास.''

मी शांत आणि काहीसा भांबावलेला...

''वसतिगृहात शिवणयंत्र ठेवता येईल का? अशी विचारणा तू केली होतीस. आठवतंय काय?''

''होय, सर आठवतंय.'' मी पटकन म्हणालो.

डी. एड. ला नंबर लागल्यानंतर दोनशे सत्तर रूपये प्रवेश फी जमा करण्यासाठीही मला खूप प्रयास मला पडले होते. दोन वर्षाचा कोर्स पूर्ण करायचा असेल तर काहीतरी कामधंद्या जोड करूनच ते शक्य होते. शिवणकामाची कला मधल्या काळात मी अवगत करून घेतलेली होती. तिचा उपयोग झाला तर डी. एड. करता येईल अशी आशा होती. म्हणून प्रवेश घेतल्यानंतर दोन–तीन दिवसातच प्राचार्यांना तशी विनंती मी केली होती. सरांनी मात्र ती तडकाफडकी अमान्य केली होती.

''त्यावर मी तुला ठाम नकार दिला होता!'' सर म्हणाले.

''लक्षात आहे सर माझ्या. म्हणून शक्य होईल त्या त्या दिवशी मी कामासाठी गावात जात होतो आणि रात्री...''

''सुरेश... नवीन प्रवेश घेणारी सर्वच मुले प्रथमतः सारखीच वाटतात. ती तशी असतातही. कोणाची परिस्थिती कशी...? कोणता विद्यार्थी कोणत्या पात्रतेचा...? कोणत्या पातळीचा...? हे समजायला वेळ जातो... असो! तुझे गावात जाणे आजपासून बंद...!'' सरांचा आवाज थोडासा जड झालेला मला तेव्हा जाणवला. मी स्तब्धपणे उभा राहिलो.

''माझ्या घरी एक शिवणयंत्र आहे. ते वसतिगृहातल्या वीस नंबरच्या खोलीत नेऊन ठेव आणि तुही तिथेच रहा. कॉलेजचे शिक्षक, त्यांची मुले, विद्यार्थी या सर्वांचे जुने–नवे येतील ते कपडे तू यापुढे शिवायचे!''

मी होकारार्थी मान डोलावली.

''यासोबतच तुला शिकवणी वगैरे घ्यायची इच्छा असेल तर घ्यायला हरकत नाही.'' मी शांतपणे उभा राहिलो. ''ठीक आहे... तू ये आता.''

मला खूप बरे वाटले. सरांना मनातल्या मनात शतवार नमन करून मी वर्गात जाऊन बसलो. नवीन अभ्यासक्रम सुरू झालेला होता. त्याचा प्रथम वर्षाचा निकाल लागून केवळ काहीच दिवस झालेले होते. गणित आणि अभ्यासक्रम व मूल्यमापन या विषयात जिल्ह्यात केवळ आठ विद्यार्थी उत्तीर्ण होते. त्यात मी टॉपर होतो. या बाबी सर्वच शिक्षकांच्या लक्षात आलेल्या होत्या.

वर्गात मी केवळ शरीराने बसलो होतो. मनातून सरांचे वारंवार आभार मानत होतो. सरांच्या मघाच्याच निर्णयाने मला खूपच मदत होणार होती. गावात जाऊन काम करताना होणारी धावपळ वाचणार होती. रात्री–बेरात्रीचे जाणे–येणे आणि पायापीठ टळणार होती.

चौथा तास चालू असताना वर्गात नोटीस आली. गणित : विषयज्ञान आणि पद्धती' आणि 'अभ्यासक्रम व मूल्यमापन' या विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आज कॉलेज सुटल्यानंतर प्राचार्यांना भेटावे, अशी ती सूचना होती. सुटी झाली. मला सरांचे पुन्हा बोलावणे आले. दोन्ही विषयात अनुत्तीर्ण असलेले आमचे सहपाठी मित्र, मी आणि प्राचार्य यांची एकत्रित चर्चा झाली. ज्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना गरज वाटत असेल त्यांचेसाठी मी किमान शुल्क आकारून शिकवणी वर्ग घ्यावा, अशी कल्पना सरांनी मांडली. मुलांना कल्पना पसंत पडली. दररोज रात्री जेवणानंतर भोजन हॉलमध्ये हा वर्ग एक तास घ्यावा असे निश्चित झाले.

खूप दिवस उपाशी राहिल्याने कोणाकडे थोडेसे शिळेपाके अन्न मागावे आणि प्रत्यक्षात मात्र दात्याने पंचपक्वान्नाचे जेवण तृप्त होईपर्यंत खाऊ घालावे असे माझे झाले. वर्षापूर्वी प्रवेश घेताना ज्या गोष्टीसाठी सरांकडे विनंती केली होती; परंतु परवानगी मिळू शकली नाही. जणुकाही मला पारखून घ्यावयाचे होते. वर्षभर निरनिराळ्या कसोट्यांचा 'कस' लावून आणि पोलीसांच्या ससेमिऱ्यातून अग्निपरीक्षा दिल्यानंतर सरांनी मदतीचा हात पुढे करायला कसलीही कसर ठेवली नव्हती! म्हणतात ना काही चांगल्या गोष्टी घडण्यासाठी निश्चित वेळ यावी लागते. कधीकधी वाईटातूनही चांगले काही घडते! परंतु त्यासाठी आयुष्याच्या अवघड वळणावर प्राचार्य बी. एस. पाटलांसारखी माणसं भेटायला भाग्य लागतं, हे मात्र नक्की!